**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः07.07.2024** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

- संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन 22 जुलैपासून सुरू होणार.

- भारताच्या वाहन उद्योगाची उलाढाल 20 लाख कोटींवर पोहोचल्याची नितीन गडकरी यांची माहिती.

- पाकिटबंद खाद्यपदार्थांच्या वेष्टणावर पदार्थांमधील प्रमाणाची माहिती ठळक आणि मोठ्या आकारात देण्यास मंजुरी.

आणि

-झिम्बाब्वे विरुद्धच्या पहिल्या वीस षटकांच्या सामन्यात भारताचा पराभव.

**अर्थसंकल्प**

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन 22 जुलैपासून सुरू होणार आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी समाज माध्यमांवरून याबाबतची माहिती देताना हे अधिवेशन 12 ऑगस्टपर्यंत सुरू राहणार असल्याचं म्हटलं आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन 2024-25 चा केंद्रीय अर्थसंकल्प 23 जुलै रोजी लोकसभेत सादर करतील.राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनासाठी

संसदेच्या दोन्ही सभागृहांची बैठक बोलावण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली असल्याचंही रिजिजू यांनी म्हटलं आहे.

**होरिबा**

वाहन उद्योगाच्या क्षेत्रात गेल्या दहा वर्षांत भारतानं जपानला मागे टाकलं असून भारतातील वाहन उद्योगातील उलाढाल 7 लाख कोटींवरून 20 लाख कोटींवर पोहचली आहे. येत्या काळात ही उलाढाल 50 लाख कोटींवर पोहचविण्याचा प्रयत्न आहे, असं प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री  नितीन गडकरी यांनी काल केलं. नागपुरातील बुटीबोरी एमआयडीसीत होरिबा कंपनीच्या एका प्रकल्पाचं उद्धाटन करताना गडकरी बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि होरिबा लिमिटेडचे ज्येष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**करार**

केंद्र सरकारनं जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्थेसोबत अर्थ सहाय्यासाठी कर्जाच्या पाचव्या आणि अंतिम टप्प्याच्या वितरणाचा करार केला आहे. मुंबई मेट्रो मार्गिका तीनसाठी हा करार करण्यात आला आहे. यावर्षी 29 फेब्रुवारीला केंद्र सरकारनं दिलेल्या मान्यतेनुसार मुंबई मेट्रो मार्ग-3 चा सुधारित प्रकल्प खर्च 37276 कोटी रुपये आहे. यापैकी जायकाचं कर्ज 21280 कोटी रुपये आहे.

**पाकीटबंद**

पाकिटबंद खाद्यपदार्थांच्या वेष्टणावर त्या पदार्थांमधली एकंदर साखर, मीठ आणि मेदाच्या प्रमाणाची माहिती ठळक आणि मोठ्या आकारात देण्याच्या प्रस्तावाला भारतीय अन्न सुरक्षितता आणि मानक प्राधिकरणानं मान्यता दिली आहे. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं काल ही माहिती दिली. ग्राहकांना ते वापरत असलेल्या उत्पादनाचं पौष्टिक मूल्य अधिक चांगल्या प्रकारे समजून घ्यायला आणि आरोग्यदायी निर्णय घेण्यास सक्षम करणं हे या दुरुस्तीचं उद्दिष्ट असल्याचं आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं म्हटलं आहे.

**नीट**

नीट पीजी प्रवेशाचं समुपदेशन पुढं ढकलल्याचं वृत्त चुकीचं असल्याची माहिती आरोग्य मंत्रालयानं दिली आहे. या बद्दल माध्यमांमध्ये प्रसारित झालेल्या बातम्यांसंदर्भात मंत्रालयानं हे स्पष्टीकरण दिलं असून समुपदेशनाची तारीख अद्याप सूचित केलेली नसल्याचं म्हटलं आहे.

**मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण रत्नागिरी**

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' या योजनेचा प्रारंभ काल रत्नागिरी जिल्ह्यात पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते करण्यात आला. एकाच दिवशी पाच हजार लाभार्थ्यांचे अर्ज स्वीकारण्यात आलेला हा राज्यातला एकमेव कार्यक्रम असल्याचं सामंत यांनी यावेळी सांगितलं. एसटीच्या लांब पल्ल्याच्या वाहतुकीप्रमाणेच शहर बस वाहतुकीतही महिला सन्मान योजना सवलतीचा प्रारंभ सामंत यांच्या हस्ते करण्यात आला.

**बहीण हिंगोली**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी बहिणींना रहिवासी प्रमाणपत्र देण्यासाठी प्रत्येकी 100 रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी हिंगोली जिल्ह्यातील डोंगरकडा इथल्या ग्रामसेवकावर गटविकास अधिकाऱ्यांच्या तक्रारीनंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी सदर ग्रामसेवकाला तडकाफडकी निलंबितही करण्यात आलं आहे.

**पालघर संपूर्णता अभियान**

नीती आयोगाच्या आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत संपूर्णता अभियानासाठी पालघर जिल्ह्यातल्या जव्हार, विक्रमगड, डहाणू, तलासरी या चार तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. 4 जुलैपासून सुरू झालेलं हे अभियान 30 सप्टेंबरपर्यंत राबविण्यात येणार आहे. ऐकूया याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून. . . . . . .

**नंदुरबार, वर्धा** या जिल्ह्यांमध्येदेखील काही तालुक्यात या अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे.

**पालखी**

टाळ-मृदंगाच्या गजरात काल ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांना नीरा नदीत स्नान घालण्यात आलं. यानंतर माऊलींच्या पालखी सोहोळ्यानं पुणे जिल्ह्याचा निरोप घेऊन सातारा जिल्ह्यात प्रवेश केला. पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी पालखी सोहोळ्याचं स्वागत केलं. आज आणि उद्या पालखी लोणंद मुक्कामी असणार आहे. तर संत तुकाराम महाराजांची पालखी आज सणसर इथं मुक्कामाला असणार आहे.

**बाईक टॅक्सी**

राज्यात बाईक टॅक्सी सुरु करण्यास विविध रिक्षा चालक संघटनांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. तर योग्यता प्रमाणपत्र घेण्यास विलंब होणाऱ्या रिक्षा चालकांवर दैनंदिन 50 रुपये दंडाची होत असलेली आकारणी देखील अयोग्य असल्याचं मत  रिक्षाचालक संघटनांनी व्यक्त केलं आहे.

**धनगर**

धनगर समाजातील तरूणांना अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या धर्तीवर, तीस लाख बिनव्याजी कर्ज द्यावं, पंढरपूर इथं अहिल्या भवनसाठी जागा उपलब्ध करून पाच कोटी निधी द्यावा आदि प्रमुख मागण्यांसाठी समाजाच्या शिष्टमंडळाकडून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना काल निवेदन देण्यात आलं.

**संवादवारी**

शासनाच्या विविध योजनांची आणि जनकल्याणकारी निर्णयांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय यांच्यावतीने संवादवारी उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमाची काल सातारा जिल्ह्यात सुरुवात करण्यात आली. जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या हस्ते या उपक्रमाचं उद्घाटन करण्यात आलं. योजनांची माहिती देणारं प्रदर्शन, चित्ररथ, पथनाट्य यांचा समावेश या संवादवारी उपक्रमामध्ये करण्यात आला आहे.

**एसटीपालक**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीनं स्थानिक पातळीवर एसटी कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी विभाग नियंत्रकांनी दर सोमवारी आणि शुक्रवारी विभागातल्या एका आगारात जाऊन 'कामगार पालक दिन' घ्यावा अशा सूचना महामंडळाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉक्टर माधव कुसेकर यांनी एसटीच्या स्थानिक प्रशासनाला दिल्या आहेत.

**ग्रंथालय**

ग्रंथालयांच्या अनुदानात 40 टक्क्याची वाढ आणि दर्जा वाढीसह नवीन मान्यतेस परवानगी दिल्याच्या निर्णयाचं ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या वतीनं स्वागत करण्यात आलं आहे. हा निर्णय आचारसहिंतेपूर्वीच लागू करावा अशी कर्मचाऱ्यांची मागणी असल्याचं  महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी संघाचे अध्यक्ष सदाशिव बेडगे यांनी म्हटलं आहे.

**अभियान**

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महापालिकेच्यावतीनं केंद्र शासनाच्या "सफाई अपनाओ, बिमारी भगाओ"  या अभियानाची आणि "एक पेड मा के नाम" या उपक्रमाची सुरुवात पालकमंत्री सुरेश खाडे आणि आयुक्त शुभम गुप्ता यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी 280 टन कचरा उचलण्यात आला.31 ऑगस्टपर्यंत हे अभियान चालणार आहे.

**निधन**

पुण्यातील सामाजिक कार्यकर्त्या डॉक्टर अरुंधती सरदेसाई यांचं 27 जूनला अमेरिकेत फिलाडेल्फिया इथं निधन  झालं. त्या 80 वर्षांच्या होत्या. सरदेसाई यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी काल पुण्यात श्रद्धांजली सभेचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी त्यांच्या बहुअंगी कार्यावर प्रकाश टाकणारा दृक-श्राव्य लघुपट दाखविण्यात आला. यावेळी श्रध्दांजली व्यक्त करतांना आकाशवाणी  पुणे केंद्राच्या माजी केंद्र प्रमुख उषःप्रभा पागे म्हणाल्या की “ साहस हा आमच्यातील समान धागा होता ; गिर्यारोहणासारख्या साहसी छंदामुळे आमच्यातील मैत्री घट्ट झाली.” यावेळी विविध संस्थांच्या प्रतिनिधींनी अरुंधती सरदेसाई यांना श्रद्धांजली अर्पण केली .

**क्रिकेट**

**भारत** आणि **झिबाब्वे** यांच्यातल्या पाच सामन्यांच्या मालिकेतल्या हरारे इथल्या पहिल्या वीस षटकांच्या सामन्यात झिम्बाब्वेनं विश्वविजेत्या भारताचा 13 धावांनी पराभव केला. विजयासाठी 116 धावांचं लक्ष्य असताना भारत केवळ 102  धावा करू शकला. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. रवि बिश्नोईनं चार गडी बाद केले. तर झिबाब्वेचा कर्णधार सिकंदर रझा यानं 3 गडी बाद केले त्याला सामनावीर पुरस्कारानं गौरविण्यात आलं. मालिकेतील दुसरा सामना आज संध्याकाळी होणार आहे.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्राचा घाट प्रदेश आणि मराठवाड्यात वीजा आणि जोराचे वाऱ्यांसह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भात व्यापक पाऊस अपेक्षित आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार